# दिल्ली डायरी

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

**दिल्ली डायरी : साने गुरुजी**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

**आवृत्ती**
१५ ऑगस्ट, २०११

**किंमत**
रुपये २७०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

## दिल्ली डायरी

आपल्या आयुष्याच्या अखेरच्या साडेचार महिन्यांत गांधीजींनी प्रार्थनोत्तर जी प्रवचने केली, ती सुमारे चारशे पृष्ठांच्या या ग्रंथात समाविष्ट करण्यात आली आहेत. नावात सूचित केल्याप्रमाणे हे पुस्तक म्हणजे खरोखर ता. १० सप्टेंबर १९४७ ते ३० जानेवारी १९४८ पर्यंतच्या गांधीजींच्या दिल्लीतील वास्तव्याची रोजनिशीच होय. अनेकांचा जीवितनाश, अपरिमित वित्तनाश आणि याहूनही अधिक म्हणजे जीवनाला अत्यावश्यक असणाऱ्या नैतिक आणि आध्यात्मिक मूल्यांचा नाश घडविणाऱ्या घटनांमुळे म. गांधी किती दुःखी झाले होते, ते सर्वांना माहीतच आहे. त्यांच्या हृदय-व्यथेचे आणि नष्ट पावलेल्या मानव-प्रतिष्ठेच्या पुनरुत्थानासाठी त्यांनी केलेल्या महान प्रयत्नांचे दर्शन या पुस्तकाच्या पानापानांतून कोणाही वाचकास होऊ शकेल. त्यांच्या नेहमीच्या लेखन-भाषणांप्रमाणेच या प्रवचनांतही त्यांनी जीवनाच्या विशाल क्षेत्रांतील विविध विषयांची चर्चा केली आहे. पण शांततेची प्रस्थापना आणि जातीय सलोखा- विशेषतः हिंदू, मुसलमान आणि शीख यांच्यातील सलोखा-यांवरच त्यांचा मुख्य भर आहे, परंतु गांधीजींच्या समोर जे ध्येय होते ते साध्य होण्याऐवजी त्यांना त्यांचे प्राण मात्र गमवावे लागले, हे आपणा सर्वांच्या जीवनाचे आणि कार्याचे दुःखपूर्ण भाष्य होय! स्वतःकडून जातीय ऐक्याची स्थापना होऊ न शकल्यास जिवंत राहण्यात त्यांना रस राहिला नव्हता, ही गोष्ट या पुस्तकाच्या वाचनाने स्पष्ट होत आहे आणि गेल्या ३० जानेवारीला आपल्या देशात जी करुण घटना घडून आली तिचे पूर्वचिन्ह म्हणूनच की काय, निराशेचा सूरही या प्रवचनांतून उठत असलेला आपणास आढळून येतो. सत्य आणि अहिंसा अनेक अगम्य मार्गांनी कार्य करीत असतात आणि असाही संभव आहे, की आपल्या जिवंतपणी महात्माजी जो चमत्कार करून

दाखवू शकले नाहीत, तो आता आपल्या मृत्यूने ते करून दाखवितील. ज्या शांततेसाठी आणि सलोख्यासाठी गांधीजींनी आपले सर्व आयुष्य खर्च केले आणि अखेरीस आपल्या प्राणांचेही बलिदान केले, त्या शांततेची आणि सलोख्याची पुन्हा संस्थापना होण्यासाठी या पुस्तकाचा चांगला उपयोग होईल.

**१७-३-१९४८** **-राजेंद्रप्रसाद**

# अनुक्रमणिका

**(या ग्रंथात ता. १० सप्टेंबर १९४७ ते ३० जानेवारी १९४८ पर्यंतच्या गांधीजींच्या दिल्लीतील वास्तव्याची रोजनिशीच होय.)**


| प्रकरण | तारीख | पान नं. | प्रकरण | तारीख | पान नं. |
|---|---|---|---|---|---|
| प्रकरण १ | १०-९-१९४७ | ७ | प्रकरण ३४ | १५-१०-१९४७ | ६९ |
| प्रकरण २ | १२-९-१९४७ | १० | प्रकरण ३५ | १६-१०-१९४७ | ७० |
| प्रकरण ३ | १३-९-१९४७ | १२ | प्रकरण ३६ | १७-१०-१९४७ | ७२ |
| प्रकरण ४ | १४-९-१९४७ | १५ | प्रकरण ३७ | १८-१०-१९४७ | ७४ |
| प्रकरण ५ | १५-९-१९४७ | १६ | प्रकरण ३८ | १९-१०-१९४७ | ७६ |
| प्रकरण ६ | १७-९-१९४७ | १७ | प्रकरण ३९ | २०-१०-१९४७ | ७८ |
| प्रकरण ७ | १८-९-१९४७ | २० | प्रकरण ४० | २१-१०-१९४७ | ८० |
| प्रकरण ८ | १९-९-१९४७ | २१ | प्रकरण ४१ | २२-१०-१९४७ | ८१ |
| प्रकरण ९ | २०-९-१९४७ | २३ | प्रकरण ४२ | २३-१०-१९४७ | ८३ |
| प्रकरण १० | २१-९-१९४७ | २५ | प्रकरण ४३ | २४-१०-१९४७ | ८५ |
| प्रकरण ११ | २२-९-१९४७ | २७ | प्रकरण ४४ | २५-१०-१९४७ | ८६ |
| प्रकरण १२ | २३-९-१९४७ | २९ | प्रकरण ४५ | २६-१०-१९४७ | ८८ |
| प्रकरण १३ | २४-९-१९४७ | ३१ | प्रकरण ४६ | २७-१०-१९४७ | ८९ |
| प्रकरण १४ | २५-९-१९४७ | ३२ | प्रकरण ४७ | २८-१०-१९४७ | ९१ |
| प्रकरण १५ | २६-९-१९४७ | ३४ | प्रकरण ४८ | २९-१०-१९४७ | ९२ |
| प्रकरण १६ | २७-९-१९४७ | ३६ | प्रकरण ४९ | ३०-१०-१९४७ | ९४ |
| प्रकरण १७ | २८-९-१९४७ | ३९ | प्रकरण ५० | ३१-१०-१९४७ | ९५ |
| प्रकरण १८ | २९-९-१९४७ | ४२ | प्रकरण ५१ | १-११-१९४७ | ९६ |
| प्रकरण १९ | ३०-९-१९४७ | ४३ | प्रकरण ५२ | २-११-१९४७ | ९७ |
| प्रकरण २० | १-१०-१९४७ | ४४ | प्रकरण ५३ | ३-११-१९४७ | १०० |
| प्रकरण २१ | २-१०-१९४७ | ४७ | प्रकरण ५४ | ४-११-१९४७ | १०२ |
| प्रकरण २२ | ३-१०-१९४७ | ४९ | प्रकरण ५५ | ५-११-१९४७ | १०६ |
| प्रकरण २३ | ४-१०-१९४७ | ५१ | प्रकरण ५६ | ६-११-१९४७ | १०८ |
| प्रकरण २४ | ५-१०-१९४७ | ५२ | प्रकरण ५७ | ७-११-१९४७ | ११० |
| प्रकरण २५ | ६-१०-१९४७ | ५४ | प्रकरण ५८ | ८-११-१९४७ | ११२ |
| प्रकरण २६ | ७-१०-१९४७ | ५७ | प्रकरण ५९ | ९-११-१९४७ | ११४ |
| प्रकरण २७ | ८-१०-१९४७ | ५९ | प्रकरण ६० | १०-११-१९४७ | ११६ |
| प्रकरण २८ | ९-१०-१९४७ | ६१ | प्रकरण ६१ | ११-११-१९४७ | ११८ |
| प्रकरण २९ | १०-१०-१९४७ | ६२ | प्रकरण ६२ | १२-११-१९४७ | १२० |
| प्रकरण ३० | ११-१०-१९४७ | ६३ | प्रकरण ६३ | १३-११-१९४७ | १२१ |
| प्रकरण ३१ | १२-१०-१९४७ | ६५ | प्रकरण ६४ | १४-११-१९४७ | १२३ |
| प्रकरण ३२ | १३-१०-१९४७ | ६६ | प्रकरण ६५ | १५-११-१९४७ | १२४ |
| प्रकरण ३३ | १४-१०-१९४७ | ६७ | प्रकरण ६६ | १६-११-१९४७ | १२५ |

| प्रकरण | तारीख | पान नं. | प्रकरण | तारीख | पान नं. |
|---|---|---|---|---|---|
| ❍ प्रकरण ६७ | १७-११-१९४७ | १२८ | ❍ प्रकरण १०३ | २४-१२-१९४७ | २०१ |
| ❍ प्रकरण ६८ | १८-११-१९४७ | १३० | ❍ प्रकरण १०४ | २५-१२-१९४७ | २०३ |
| ❍ प्रकरण ६९ | १९-११-१९४७ | १३२ | ❍ प्रकरण १०५ | २६-१२-१९४७ | २०५ |
| ❍ प्रकरण ७० | २०-११-१९४७ | १३६ | ❍ प्रकरण १०६ | २७-१२-१९४७ | २०६ |
| ❍ प्रकरण ७१ | २१-११-१९४७ | १३८ | ❍ प्रकरण १०७ | २८-१२-१९४७ | २०८ |
| ❍ प्रकरण ७२ | २२-११-१९४७ | १४२ | ❍ प्रकरण १०८ | २९-१२-१९४७ | २०९ |
| ❍ प्रकरण ७३ | २३-११-१९४७ | १४४ | ❍ प्रकरण १०९ | ३०-१२-१९४७ | २१३ |
| ❍ प्रकरण ७४ | २४-११-१९४७ | १४५ | ❍ प्रकरण ११० | ३१-१२-१९४७ | २१५ |
| ❍ प्रकरण ७५ | २५-११-१९४७ | १४८ | ❍ प्रकरण १११ | १-१-१९४८ | २१७ |
| ❍ प्रकरण ७६ | २६-११-१९४७ | १५० | ❍ प्रकरण ११२ | २-१-१९४८ | २१८ |
| ❍ प्रकरण ७७ | २७-११-१९४७ | १५२ | ❍ प्रकरण ११३ | ३-१-१९४८ | २१९ |
| ❍ प्रकरण ७८ | २८-११-१९४७ | १५४ | ❍ प्रकरण ११४ | ४-१-१९४८ | २२० |
| ❍ प्रकरण ७९ | २९-११-१९४७ | १५६ | ❍ प्रकरण ११५ | ५-१-१९४८ | २२१ |
| ❍ प्रकरण ८० | ३०-११-१९४७ | १५८ | ❍ प्रकरण ११६ | ६-१-१९४८ | २२५ |
| ❍ प्रकरण ८१ | १-१२-१९४७ | १६० | ❍ प्रकरण ११७ | ७-१-१९४८ | २२७ |
| ❍ प्रकरण ८२ | २-१२-१९४७ | १६२ | ❍ प्रकरण ११८ | ८-१-१९४८ | २२८ |
| ❍ प्रकरण ८३ | ३-१२-१९४७ | १६४ | ❍ प्रकरण ११९ | ९-१-१९४८ | २३० |
| ❍ प्रकरण ८४ | ४-१२-१९४७ | १६७ | ❍ प्रकरण १२० | १०-१-१९४८ | २३२ |
| ❍ प्रकरण ८५ | ५-१२-१९४७ | १७० | ❍ प्रकरण १२१ | ११-१-१९४८ | २३४ |
| ❍ प्रकरण ८६ | ६-१२-१९४७ | १७१ | ❍ प्रकरण १२२ | १२-१-१९४८ | २३६ |
| ❍ प्रकरण ८७ | ७-१२-१९४७ | १७२ | ❍ प्रकरण १२३ | १३-१-१९४८ | २४० |
| ❍ प्रकरण ८८ | ८-१२-१९४७ | १७३ | ❍ प्रकरण १२४ | १४-१-१९४८ | २४३ |
| ❍ प्रकरण ८९ | ९-१२-१९४७ | १७५ | ❍ प्रकरण १२५ | १६-१-१९४८ | २४८ |
| ❍ प्रकरण ९० | १०-१२-१९४७ | १७७ | ❍ प्रकरण १२६ | १७-१-१९४८ | २५१ |
| ❍ प्रकरण ९१ | ११-१२-१९४७ | १७८ | ❍ प्रकरण १२७ | १८-१-१९४८ | २५२ |
| ❍ प्रकरण ९२ | १२-१२-१९४७ | १७९ | ❍ प्रकरण १२८ | १९-१-१९४८ | २५६ |
| ❍ प्रकरण ९३ | १३-१२-१९४७ | १८१ | ❍ प्रकरण १२९ | २०-१-१९४८ | २५८ |
| ❍ प्रकरण ९४ | १४-१२-१९४७ | १८२ | ❍ प्रकरण १३० | २१-१-१९४८ | २६१ |
| ❍ प्रकरण ९५ | १५-१२-१९४७ | १८३ | ❍ प्रकरण १३१ | २२-१-१९४८ | २६४ |
| ❍ प्रकरण ९६ | १६-१२-१९४७ | १८७ | ❍ प्रकरण १३२ | २३-१-१९४८ | २६६ |
| ❍ प्रकरण ९७ | १७-१२-१९४७ | १८८ | ❍ प्रकरण १३३ | २४-१-१९४८ | २६८ |
| ❍ प्रकरण ९८ | १८-१२-१९४७ | १९० | ❍ प्रकरण १३४ | २५-१-१९४८ | २६९ |
| ❍ प्रकरण ९९ | १९-१२-१९४७ | १९२ | ❍ प्रकरण १३५ | २६-१-१९४८ | २७१ |
| ❍ प्रकरण १०० | २०-१२-१९४७ | १९३ | ❍ प्रकरण १३६ | २७-१-१९४८ | २७४ |
| ❍ प्रकरण १०१ | २२-१२-१९४७ | १९५ | ❍ प्रकरण १३७ | २८-१-१९४८ | २७६ |
| ❍ प्रकरण १०२ | २३-१२-१९४७ | १९८ | ❍ प्रकरण १३८ | २९-१-१९४८ | २७८ |


✦✦✦

# १ १०।०९।१९४७

## (अ) मृतांचे शहर

संचारबंदी होती. त्यामुळे प्रार्थनेला फार लोक नव्हते. तरीही साऱ्या दिल्लीला उद्देशून गांधीजी बोलले. ते म्हणाले :

'जेव्हा मी शहादरा स्टेशनवर आलो तेव्हा स्वागतासाठी सरदार, राजकुमारी इत्यादी मंडळी आली होती. मी त्यांच्याकडे पाहिले. आज मला सरदारांच्या ओठावर ते चिरपरिचित हास्य दिसले नाही. आज ते हसत नव्हते. नेहमीप्रमाणे थट्टामस्करी करीत नव्हते. रेल्वेतून उतरल्यावर जे जे भेटले, जे जे दिसले, त्या सर्वांच्या चेहऱ्यावर सरदारांच्या खिन्नतेचीच छाया पसरलेली दिसली. नेहमी आनंदी असणारी दिल्ली आज जणू मृतांची नगरी झाली होती. दुसरेही एक आश्चर्य माझ्यासाठी वाढून ठेवलेले होते. ज्या भंगीवस्तीत राहण्याने मला आनंद होतो, तेथे आज मला नेण्यात आले नाही. बादशाही बिर्ला भवनात मला नेण्यात आले. याचे कारण समजल्यावर मला दुःख झाले. ज्या बिर्ला भवनात मी पूर्वी नेहमी राहत असे, तेथे आज पुन्हा गेल्याने मला बरेही वाटले. मी भंगी वस्तीत असलो काय किंवा बिर्लाभवनात आलो काय, दोन्ही ठिकाणी मी बिर्ला बंधूंचाच पाहुणा असतो, त्यांचीच मंडळी माझी सर्व प्रकारची काळजी घेत असते. मला आज भंगीवस्तीत न नेता बिर्ला भवनात नेण्यात आले; परंतु हा जो फेरबदल करण्यात आला, त्याला सरदार कारण नाहीत. वाल्मिकी वस्तीत माझा नीट सांभाळ होईल की नाही याची चिंता करीत बसण्याचा दुबळेपणा सरदारांजवळ नाही. भंगी वस्तीत राहिल्याने मला फार आनंद होत असतो; परंतु तेथील घरातून आज इतकी गर्दी आहे की मला तेथे राहणे अशक्य झाले आहे. नव्या दिल्लीच्या समितीचा हा दोष आहे.

## (ब) निर्वासितांचा प्रश्न

भंगी वस्तीत जेथे मी राहतो, तेथे आज शरणार्थी लोक येऊन राहिले आहेत, म्हणून बिर्ला भवनात मला जावे लागले. माझ्यापेक्षा शरणार्थींची जरुरी कितीतरी अधिक आहे. परंतु निराश्रितांचा असा प्रश्न उभा राहणे ही गोष्ट एक राष्ट्र म्हणून आपणास लाजिरवाणी नाही का? पंडित नेहरू आणि सरदार पटेल यांच्याबरोबर कायदे–आझम जिना, लियाकत अली वगैरे पाकिस्तानी पुढाऱ्यांनीही असे जाहीर केले होते की अल्पसंख्य जमातींना बहुसंख्य जमातीप्रमाणेच वागविण्यात येईल; कोणताही फरक करण्यात येणार नाही. दोन्ही सरकारांनी ही गोष्ट का केवळ बाहेरच्या जगाला खूश करण्यासाठी सांगितली होती? की त्यांना दुनियेला असे दाखवायचे आहे की आम्ही

बोलतो त्याप्रमाणे वागतो, आमचा शब्द खरा करण्यासाठी आम्ही प्राणांचे बलिदानही करू? आज हिंदू आणि शीख यांना स्वतःची घरेदारे सोडून पाकिस्तानातून इकडे का यावे लागत आहे? तेथील घरंदाज, स्वाभिमानी मंडळी इकडे निघून का येत आहेत? क्वेट्टा, नबाबशहा जिल्हा कराची येथे काय चालले आहे? पश्चिम पंजाबमधील दुःखदायक करुण कहाण्या वाचून नि ऐकून हृदय पिळवटून निघते. 'हे सारे गुंडांचे काम आहे, काय करणार?' असे हिंदुस्थानी नि पाकिस्तानी सरकारांनी लाचार होऊन म्हणणे शोभत नाही. आपापल्या राज्यातील प्रजेच्या रक्षणाची जबाबदारी प्रत्येक सरकारच्या शिरावर आहे. ती पार पाडणे प्रत्येक सरकारचे कर्तव्य आहे. असे झाले, तसे झाले अशा पळवाटा काढण्यात अर्थ नाही. दोन्ही सरकारांनी आपापली कर्तव्ये पार पाडावी, तसे करताना मरावे. साम्राज्यशाहीच्या चिरडून टाकणाऱ्या दडपणाखाली काही आता काम नाही करायचे; परंतु याचा अर्थ असा नाही की कायद्याचे राज्य नाहीसेच झाले. तुम्हाला जगासमोर उभे राहायचे आहे. दिल्लीचे प्रधान जगाला का असे सांगणार की दिल्लीची जनता आमचे ऐकत नाही, हे निर्वासित कायदा मानीत नाहीत? तुम्ही का आपली दिवाळखोरी जगाला जाहीर करणार? स्वेच्छेने नि आनंदाने निर्वासित लोक कायदा मानीत नाहीत म्हणजे काय? या लोकांना त्यांच्या वेडेपणापासून परावृत्त करण्याची प्रधानांनी पराकाष्ठा केली पाहिजे. हताश होऊन हातपाय गाळून न बसता असे प्रयत्न करण्यास त्यांनी झटावे.

गांधीजी बोलत होते. त्यांचा आवाज फारच हळू होता. तरीही मृतवत दिसणाऱ्या दिल्लीतील आपल्या संचाराची हकीगत ते सांगत होते. ते म्हणाले : मी ज्या घरात राहतो, तेथे फळे नाहीत, भाजीपाला नाही! काही मुसलमानांनी गोळीबार केला म्हणून भाजीबाजारात भाजी मिळू नये ही किती शरमेची गोष्ट! हिंडताना मी ऐकले की निराश्रितांना अन्न मिळत नाही. जे काही देण्यात येते ते खाण्यालायक नसते; परंतु सरकारचा यात दोष आहे त्याप्रमाणे निराश्रितांचाही आहे. या निराश्रितांनी सारा गाडाच बंद पाडला आहे. आवश्यक हालचालीही होऊ शकत नाहीत. आपण आपलेच नुकसान करीत आहोत हे या निराश्रितांच्या ध्यानात कसे येत नाही? अपाली सर्व योग्य ती दुःखे दूर व्हावी म्हणून सरकारवर जर ते विश्वास ठेवतील तर त्यांच्या बऱ्याचशा अडचणी दूर होतील, ही गोष्ट या शरणार्थींच्या लक्षात यायला हवी.

मी हुमायून बादशहाच्या कबरेजवळील मेयो लोकांच्या छावणीत गेलो होतो. हलवार आणि भरतपूर संस्थानांतून आम्हाला हाकलून देण्यात आले असे त्यांनी सांगितले. मुसलमान मित्र पाठवितात त्यापलीकडे दुसरे अन्न आम्हाला मिळत नाही



असेही ते म्हणाले. मेयो लोक एकदम भडकतात व गडबड करतात. त्यांचा हा स्फोटक स्वभाव मला माहीत आहे; परंतु त्यांची इच्छा नसताना त्यांची पाकिस्तानात रवानगी करणे हा मार्ग निश्चितच योग्य नव्हे. इतर रोगांवर आपण उपचार करतो त्याप्रमाणे त्यांच्या मनोविकृतींवर आपण उपचार केले पाहिजेत, त्यांची मने निरोगी होतील अशी खटपट केली पाहिजे.

मी जामिया- मिलियामध्येही गेलो होतो. या संस्थेच्या निर्मितीत माझाही मोठा हिस्सा आहे. डॉ. झकीर हुसेन माझे प्रिय मित्र आहेत. डॉक्टरांनी आपले अनुभव मला सांगितले. त्यांना दुःख होत होते; परंतु त्यात कटुता नव्हती. नुकतेच ते जलंदरला गेले होते. प्रक्षुब्ध शीख त्यांचा मुडदा पाडायच्या बेतात होते. मुसलमान असणे हाच त्यांचा अपराध होता. रेल्वेतील एक हिंदू कर्मचारी आणि एक शीख कॅप्टन यांची वेळेवर मदत न मिळते तर डॉ. राहते ना. त्यांनी कृतज्ञतापूर्वक तो अनुभव मला निवेदिला. जामिया मिलिया ही राष्ट्रीय संस्था आहे. कितीतरी हिंदूही येथे शिकून गेले आहेत. प्रक्षुब्ध निर्वासित आणि त्यांचे पक्षपाती अशा संस्थेलाही वाचवू इच्छीत नाहीत असे दिसते. आज 'जामिया-मिलिया'मध्ये शंभरएक मुसलमान शरणार्थी कसेबसे जीव धरून राहिले आहेत. त्यांच्या अडचणी मी खाली मान घालून ऐकत होतो. दिवाण हॉल, वेव्हेल कॅन्टीन कँप आणि किंग्जवे कँप येथेही गेलो होतो. तेथे शीख आणि हिंदू शरणार्थी होते. मी पूर्वी केलेली पंजाबची सेवा ते अगदीच विसरले नव्हते; परंतु सर्व छावण्यांतून क्रोधी चेहरे मला मधूनमधून दिसत होते. त्यांना राग येणे स्वाभाविक होते. ते क्षम्य आहे. मी हिंदूंच्या बाबतीत कठोर हृदयाने वागतो असा त्यांनी माझ्यावर आरोप केला. ते म्हणालेः तुम्हाला आमच्यासारख्या आपत्ती थोड्याच भोगाव्या लागल्या आहेत? आमची प्रिय मंडळी, आप्तेष्ट मंडळी आम्ही गमावून बसलो. तुमचे तसे थोडेच झाले आहे? आमचे घरदार गेले, जवळ दिडकी नाही, केवळ निराधार बनलो. तुमचे सारे ठीक आहे. तुम्हाला आमची काय कल्पना?' मी त्यांचे समाधान कसे करणार? हिंदुस्थानची राजधानी-ही दिल्ली मी शांततामय करू पाहात आहे. जेथे पूर्ववत सारा व्यवहार सुरू व्हावा म्हणून मदत करण्यासाठी मी येथे आलो आहे, असे सांगून त्यांचे थोडेच समाधान होणार होते? मी मृतांना जिवंत करू शकत नाही; परंतु मानवी वा मानवतेवर जीवनाला- सर्वच जीवनाला मृत्यूचा आशीर्वाद आहे. मृत्यू ही प्रभूची कृपाच आहे. जीवनाला जोडूनच मरण आहे. मरण कधी व कसे येणार एवढाच काय तो प्रश्न असतो. सदाचार हाच जीवनाचा खरा मार्ग आणि या मार्गाने जाणाऱ्याला मृत्यू सुसह्य होतो एवढेच नाही तर तो सुंदर वाटतो, रमणीय वाटतो.

## (क) खरा शीख

दिवसा मला एक शीख मित्र भेटला. तो म्हणाला, ‘मी शीख असलो तरी ‘ग्रंथसाहेबांच्या प्रकाशात’ मी खरा शीख आहे असे मी म्हणू शकणार नाही.’ मी त्याला विचारले, ‘मी खरा शीख आहे असा दावा करणारा आजपर्यंत तुम्हाला कोणी आढळला का?’ त्याने नकार दिला. तेव्हा मी नम्रपणे म्हटले, ‘मी खरा शीख आहे. ग्रंथसाहेबांच्या शिकवणीप्रमाणे जगण्याचा मी प्रयत्न करीत असतो.’ एके काळी शीख मला आला खरा मित्र मानीत. गुरुनानक हिंदू-मुसलमानात भेद करीत नसत. सारी मानवजात त्यांना एक वाटे. माझा सनातन हिंदुधर्मही असाच आहे. याच अर्थाने मी मुसलमानही आहे. ‘ईश्वर एक आहे आणि दिवसा, रात्री तो सर्वांचा सांभाळ करतो,’ अशी जी मुस्लीम प्रार्थना आहे ती मीही म्हणत असतो.

माझे सर्व शरणार्थींना सांगणे आहे की सत्याने वागा; निर्भय असा; मनात कोणाहीविषयी द्वेषमत्सर बाळगू नका, मोठ्या कष्टाने मिळालेले स्वातंत्र्याचे फळ, रागाच्या भरात वेडेवाकडे वागून, गमावून बसू नका.

✦✦✦

## २ — १२।०९।१९४७

## (अ) सरहद्द प्रांतातील वार्ता

सरहद्द प्रांतातून दुःखदायक बातम्या येत होत्या. गांधीजी म्हणाले, ‘माझ्या दुःखाला सीमा नाही. सरहद्द प्रांताला मी चांगल्या रीतीने ओळखतो. मी कित्येक आठवडे तिकडे दौरा काढलेला आहे. खान बंधूंच्या घरी मी निश्चिंत असे, परिपूर्ण सुरक्षितता मला वाटे, परंतु माजी मंत्री श्री. गिरिधारीलाल पुरी यांची तार आली आहे. ‘माझा आणि माझ्या पत्नीचा बचाव करा’ असे ते कळवितात. दोघे उत्कृष्ट कार्यकर्ते आहेत. ती तार मला दाखविण्यात आली. माझी वेदना मी कशी सांगू? अशी बातमी ऐकून लज्जेने माझी मान खाली होते. मुसलमानांइतकेच हिंदूंना नि शिखांना सुरक्षित वाटेल असे करणे हे तेथील सरकारचे काम आहे. कायदेआझम यांनी या गोष्टीकडे लक्ष दिले पाहिजे.’

## (ब) क्रोध म्हणजे अविवेकाचा लहान भाऊ

सरहद्द प्रांतातील दुर्दैवी घटनांसंबंधी दुःखाने बोलता बोलता गांधीजी पुढे म्हणाले : ‘प्रक्षुब्ध होऊन, रागावून काहीएक होणार नाही. क्रोधाने सूडबुद्धी जन्मते. आणि सर्वत्र आज जे भीषण प्रकार होत आहेत ते सूडबुद्धीमुळेच होत आहेत. दिल्लीतील गोष्टींचा बदला तिकडे मुसलमानांनी घेतला तर त्यात त्यांचा काय फायदा?



किंवा सरहद्द प्रांतात आणि पश्चिम पंजाबात हिंदू-शिखांवर जे क्रूर हल्ले होत आहेत, त्यांचा बदला येथील हिंदू-शिखांनी घेतला तर त्याने काय साधले? एखादा मनुष्य किंवा एखादा जमाव पिसाटाप्रमाणे वागू लागला तर सर्वांनी का पिसाट व्हायचे? माझे हिंदूंना आणि शिखांना सांगणे आहे की खून, लूटमार, जाळपोळ करून स्वतःच्या धर्माचा नाश नका करू. मी धर्माचा अभ्यास केला आहे. कोणताही धर्म असा वेडेपणा शिकवीत नाही. इस्लामही याला अपवाद नाही. हे अविचारी अत्याचार एकदम थांबवा अशी माझी तुम्हाला कळकळीची प्रार्थना आहे. स्वातंत्र्याची मिळालेली गोड भाकरी आपणास पचविता न आल्यामुळे आपण गमावून बसलो असे भावी पिढ्यांना म्हणायला न लागो! तुम्ही हा पागलपणा न सोडाल तर जगाच्या दृष्टीने भारताचे नाव कलंकित होईल ही गोष्ट ध्यानात धरा.

## (क) झाले गेले विसरा

मी जुम्मा मशिदीत गेलो होतो. जगात अशी सुंदर मशीद नाही; परंतु तेथील दृश्य पाहून मी विव्हळ झालो. मुस्लिम बंधू-भगिनी अपार दुःख-कष्ट भोगीत आहेत. मी त्यांचे समाधान करीत होतो. मरण सर्वांनाच यायचे आहे असे मी म्हटले. मृतांसाठी रडण्यात अर्थ नाही. रडण्याने मेलेले परत थोडेच यायचे आहेत? या महान देशाचा भविष्यकाल तरी उज्ज्वल करू या, तो तरी सारे मिळून सांभाळूया. कितीतरी मुस्लीम मित्र दररोज मला भेटायला येतात. मोकळेपणे सारे सांगा, बोला, असे मी त्यांना म्हणत असतो. दिल्लीत किंवा हिंदुस्थानच्या कोणत्याही भागात आपले प्राण धोक्यात आहेत असे मुसलमानांना वाटावे याचे मला वाईट वाटते. केवढी दुःखाची ही गोष्ट! मी अनेक अनुभवातून गेलो आहे. मी आता वृद्ध झालो आहे. या म्हाताऱ्याचे ऐका. ‘बदल्यास बदला’ या मार्गाने प्रश्न कधीही सुटत नसतो. अपकाराचा अपकारानेच प्रतिकार करू नका. भल्याजवळ भलेपणाने वागणे हा काही मोठा सद्गुण नव्हे, तर वाईटाजवळ चांगले वागणे, अपकाराची फेड उपकाराने करणे हा खरा सत्याचा मार्ग होय. कितीतरी मुस्लीम मित्रांचीही मदत करण्याची इच्छा आहे; परंतु आजकालच्या दिल्लीत त्यांची प्रत्यक्ष मदत घेणे दुरापास्त होऊन बसले आहे.

मी तुमच्या आत्म्याला हाक मारीत आहे. झाले गेले विसरून जा अशी शीख, हिंदू, मुसलमान, सर्वांना माझी प्रार्थना आहे. दुःखे उगाळीत बसू नका. मैत्रीचा हात एकमेकांना द्या. एकमेकांजवळ शांतीने राहण्याचा निश्चय करा. गुण्यागोविंदाने राहण्याची प्रतिज्ञा करा. हिंदी संघराज्यात राहण्यात मुसलमानांना अभिमान वाटला पाहिजे. त्यांनी तिरंगी झेंड्याला प्रणाम केला पाहिजे. ते स्वतःच्या धर्माशी प्रामाणिक असतील तर

कोणीही हिंदू त्यांचा शत्रू होऊ शकणार नाही. हिंदू-शिखांनीही शांतिप्रिय मुसलमानांना आपल्यामध्ये आनंदाने राहू दिले पाहिजे. त्यांचे तुम्ही स्वागत करायला हवे. मुसलमानांजवळ शस्त्रास्त्रे आहेत असे मला सांगण्यात आले. त्यांनी ती ताबडतोब परत करावी आणि सरकारनेही त्यांच्यावर खटले भरू नये. हिंदू आणि शीख यांनीही याचप्रमाणे केले पाहिजे. पश्चिम पंजाब सरकार मुसलमानांना हत्यारे देत आहे असे मला सांगण्यात आले. ही गोष्ट खरी असेल तर ती फार वाईट गोष्ट आहे. असे करणे चूक आहे. अशाने अखेरीस त्यांचाच सर्वनाश होईल. ही गोष्ट ताबडतोब थांबली पाहिजे. कोठेही कोणाजवळ बिगरपरवाना हत्यार असता कामा नये.

दिल्लीत लवकर शांती आणा. मला ही भिक्षा घाला. येथे शांती येताच मला पूर्व नि पश्चिम पंजाबात जाता येईल. माझे एक जीवित कार्य आहे. सर्वांसाठी माझा एकच संदेश आहे. दिल्लीचे नागरिक थोडा वेळ पागल झाले; परंतु लवकरच ते शांत नि समतोल झाले, शहाणपण परत आले असे सर्वांना म्हणू दे. तुमचे मुख्यमंत्री नि उपमुख्यमंत्री जवाहरलाल आणि सरदार यांना पुन्हा आपले शिर उंच करता येऊ दे. आज त्यांचे मस्तक लाजेने नि दुःखाने खाली आहे. अमोल असा तुमचा वारसा आहे आणि हा तुम्हा सर्वांचा संयुक्त असा वारसा आहे हे विसरू नका. हा वारसा सांभाळा. तो कलंकित करू नका. तुमचे हे कर्तव्य आहे.

### (ड) राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

माझे आणि डॉक्टर दिनशा मेथांचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या गुरुजींजवळ बोलणे झाले. या संस्थेचेही हात रक्ताने माखलेले आहेत असे मला सांगण्यात आले होते; परंतु संघाचे गुरुजी मला आश्वासनपूर्वक म्हणाले, 'ही गोष्ट साफ खोटी आहे.' ते म्हणाले, 'आमची संघटना कोणाचीही शत्रू नाही. मुसलमानांना ठार करणे हे तिचे ध्येय नाही. सर्व शक्तीने हिंदू धर्माचा बचाव करणे हे संस्थेचे ध्येय आहे. आमची संस्था शांतीसाठीच आहे. माझे हे सांगणे तुम्ही सर्वांना जाहीर करा.' त्यांचे म्हणणे मी तुम्हाला सांगितले आहे.

✦✦✦

## ३ १३।०९।१९४७

### (अ) सरकारवर विश्वास ठेवा

प्रार्थना संपली आणि गांधीजी बोलू लागले :

'मला १९१५ मधील आठवण येते, त्या वेळेस मी दिल्लीत आचार्य रुद्र यांच्याकडे राहत होतो. आचार्य रुद्र निष्ठावंत ख्रिस्ती होते आणि भारतमातेचेही सत्पुत्र



होते. हकीमसाहेब आणि डॉ. अन्सारी यांच्याशी त्यांनीच माझा प्रथम परिचय करून दिला. दोघेही हिंदू, मुसलमान व इतर हिंदी जनता यांच्याकडे समान प्रेमाने नि आदराने बघत. हकीमसाहेब हजारो हिंदूंना मोफत औषध देत ही गोष्ट मला माहीत आहे. साऱ्या दिल्लीचे ते आवडते सरदार होते. अशा लोकांना का तुम्ही नालायक समजणार? हिंदू-शिखांच्या भीतीने डॉक्टर अन्सारींची मुलगी जोहरा आणि तिचे पती डॉ. शौकतुल्ला खान यांना घर सोडून एका उपाहारगृहात जाऊन राहावे लागत आहे? खरोखर किती शरमेची ही गोष्ट! ज्या मुसलमानात हकीम अमजलखान, डॉ. अन्सारी अशी माणसे झाली, त्यांना हिंदी संघराज्यात जर सुरक्षितपणे राहता येत नसेल तर मी कशासाठी जगू? खरोखर सांगतो की अशा परिस्थितीत जगण्यात मला राम वाटत नाही. हिंदी संघराज्यातील मुसलमान सारे पंचमदळी आहेत असे मला सुचविण्यात आले; परंतु एकजात सर्वच मुसलमानांवर केलेल्या या आरोपावर मी विश्वास ठेवू शकत नाही. हिंदी संघराज्यात साडेचार कोटी मुसलमान आहेत. ते सारेच नतद्रष्ट असतील तर इस्लाम धर्माला स्वतःच्या हातांनीच ते मूठमाती देतील. कायदेआझमांनी हिंदी संघराज्याशी निष्ठावंत राहा असे येथील मूसलमानास फर्माविले आहे. जे देशद्रोह करतील त्यांचे शासन हिंदी सरकार करील. तुम्ही आपल्याच हातात कायदा घेता कामा नये.

### (ब) प्रभू सर्वांचा त्राता

आज मी एकाच निरश्रितांच्या छावणीला भेट देऊ शकलो. ही छावणी जुन्या किल्ल्यात आहे. तेथे कितीतरी मुसलमान शरणार्थी आहेत! त्यांच्या थव्यातून माझी गाडी जात होती. आणखी पुष्कळ शरणार्थी येत होते. जरी जमाव मोठा होता आणि मुख्य अधिकारी उपस्थित नव्हता, तरीही मी त्या शरणार्थींना चार धीराच्या गोष्टी सांगण्याचा हट्ट धरला. मुस्लिम सेवकांनी सर्वांना खाली बसायला सांगितले. शांतपणे ऐका असे त्यांनी त्यांना विनविले. सारे खाली बसले. कडेकडेने थोडे उभे होते. त्यांच्या मुद्रेवर क्रोध होता. उपहास करणाऱ्यांना व टिंगल करणाऱ्यांना मुस्लीम स्वयंसेवकांनी परोपरीने समजावून शांत बसविले. मला फार बोलायचे नव्हते. मी माझ्या दुबळ्या आवाजात बोलत होतो. दिवाण चमनलालांच्या खांद्यावर हात ठेवून मी बोलत होतो. मी जे बोलत होतो ते दिवाण चमनलाल मोठ्याने सांगत होते. मी त्यांना काय बरे सांगितले? एवढेच सांगितले की, 'शांत व्हा, क्रोध सोडा. ईश्वर सर्वांचा आधार आहे. मनुष्य कितीही मोठ्या पदावर असला तरी तो कितीसा पुरणार? खरा आधार प्रभूचा! माणसाने बिघडविलेले परमात्मा दुरुस्त करील. मुनष्याने वाकडे केले, ईश्वर सारे सरळ करील. दिल्लीत पूर्ववत शांती नांदू लागेपर्यंत मी स्वस्थ बसणार नाही. हिंदू-मुसलमान